ePaper
कल्याणमध्ये इमारतीचा स्लॅब कोसळून मोठी दुर्घटना, 6 जणांचा मृत्यू
वर्ष - 8 । अंक - 285 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™

## आतील पानांत


- सूर्यवंशी धोनीच्या पाया पडला!
- विजयासह केला मोहिमेचा शेवट!
- ऑपरेशन सिंदूर'वर ठोस भूमिका मांडा!
- मदरशांमध्ये ऑपरेशन सिंदूरचा धडा


www.mahaenews.com | बुधवार, दि. 21 मे 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## मान्सूनबाबत आनंदाची बातमी

# लवकरच मान्सूनची एन्ट्री!

## 16 वर्षांत नाही घडलं ते आता होणार, यंदा मान्सून वेळेआधीच केरळमध्ये दाखल होण्याचा अंदाज

**। मुंबई / पुणे । प्रतिनिधी । महाईन्यूज**

**अवकाळी पावसानं महाराष्ट्राला झोडपून काढलं आहे, पुणे, मुंबईसह राज्यातील अनेक भागांमध्ये जोरदार पाऊस सुरू आहे. पुढील तीन ते चार दिवस राज्यामध्ये मुसळधार पाऊस पडू शकतो असा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर हवामान विभागाकडून नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. अवकाळी पावसाचा शेतकऱ्यांना मोठा फटका बसला असून, मोठं नुकसान झालं आहे. तर काही भागांमध्ये दुर्घटना देखील घडल्या आहेत. दरम्यान आता एक मोठी बातमी समोर येत आहे ती म्हणजे लवकरच मान्सूनची केरळमध्ये एन्ट्री होणार आहे.**

मान्सून वेळेआधीच केरळमध्ये दाखल होणार असल्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. भारतीय हवामान खात्यानं (IMD) वर्तवलेल्या अंदाजानुसार नैऋत्य मोसमी पावसाचे आगमन पुढील चार ते पाच दिवसांत केरळमध्ये होण्याची शक्यता आहे. दर वर्षी एक जूनला मान्सूनचं केरळमध्ये आगमन होतं. मात्र यावर्षी एक जूनच्या आधीच केरळमध्ये पावसाचं आगमन होण्याची शक्यता आहे. पुढील चार ते पाच दिवसांमध्ये केरळमध्ये मान्सूनच्या आगमनाला अनुकून परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. जर हा अंदाज खरा ठरला, तर 2009 नंतर पहिल्यांदाच वेळेआधी केरळात मान्सूनच आगमन होणार आहे. 2009 साली 23 मे रोजी केरळमध्ये मान्सून दाखल झाला होता. त्यानंतर आता पहिल्यांदाच केरळमध्ये मान्सूनची लवकर एन्ट्री होण्याची शक्यता आहे.

### कोकणाला रेड अलर्ट

दरम्यान पुढील 48 तास धोक्याचे आहेत. हवामान विभागाकडून कोकणात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर उद्या बुधवारी कोकणात हवामान विभागाकडून रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर दुसरीकडे मराठवाडा आणि विदर्भाला यलो अलर्ट देण्यात आला आहे. मुंबईमध्ये आज अनेक ठिकाणी जोरदार पाऊस सुरू असून, उद्या देखील मुंबईला पावसाचा इशारा देण्यात आला आहे. आज पुण्यात देखील जोरदार पावसानं हजेरी लावली, अनेक ठिकाणी पाणी साचल्याचं पाहायला मिळालं. अचानक आलेल्या पावसानं नागरिकांची चांगलीच धावपळ उडाली.





### वळवाच्या पावसात आतापर्यंत 27 जणांचा मृत्यू

वळवाच्या पावसामुळे मराठवाड्यात आतापर्यंत २७ व्यक्तींचा मृत्यू झाला असून, ३९२ जनावरे दगावली आहेत. मराठवाड्यात वीज पडण्याचे प्रमाण अधिक असल्याने वीज अटकाव करणारी यंत्रे वाढवावीत, अशा सूचना मान्सूनपूर्व बैठकीत करण्यात आल्या आहेत. मराठवाड्यात ५०३ वीज अटकाव यंत्रे आहेत. त्यातील सर्वाधिक ३०८ एकट्या बीड जिल्ह्यात आहेत. आतापर्यंत मृत व्यक्तींची संख्याही बीडमध्येच सर्वाधिक आहे.

### मराठवाड्यात वीज अटकाव यंत्राचे व्यस्त प्रमाण

विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी सोमवारी घेतलेल्या मान्सूनपूर्व आढावा बैठकीमध्ये छत्रपती संभाजीनगरमध्ये ७५, जालना व लातूर जिल्ह्यात प्रत्येकी तीन, धाराशिव आणि परभणी जिल्ह्यात प्रत्येकी चार एवढीच वीज अटकाव यंत्रे आहेत.यातील परभणी जिल्ह्यातील सर्व यंत्रे नादुरुस्त अवस्थेत असल्याची माहिती या बैठकीमध्ये देण्यात आली. गेल्या दहा दिवसांपासून मराठवाड्यात पावसामुळे मृत्यूचे प्रमाण वाढले असून, मे महिन्यात वीज पडून मृत्यू होण्याचे प्रमाण वाढल्याचे दिसून आले आहे. एका वीज अटकाव यंत्राची किंमत पाच हजार रुपयांपेक्षाही कमी आहे. जर वीज पडून मृत्यू कमी करायचे असतील, तर ही यंत्रे वाढवावी लागतील, अशी मागणी केली जात आहे.

### कोल्हापूरला पावसाने झोडपलं

नयन यादवाड, कोल्हापूर : गेल्या आठवड्याभरापासून सुरू असलेल्या वळीवाच्या पावसाने कोल्हापूरकरांना उकड्यापासून विश्रांती दिली होती. मात्र आज दुपारी साडेचारच्या सुमारास पडलेल्या पावसाने कोल्हापूर शहरासह जिल्ह्याला अक्षरशः झोडपलं आहे. वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे अनेक ठिकाणी मोठं नुकसान झालं. काही भागात गुडघ्या एवढं पाणी साचल आहे. वळीवाच्या पावसानेच कोल्हापूर शहर अक्षरशः तुंबल आहे. महानगरपालिकेने पावसाळ्याच्या तोंडावर कोणती स्वच्छता केली? यावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. आज दुपारी साडेचारच्या सुमारास कोल्हापूर शहरासह जिल्ह्यात मुसळधार पावसाने हजेरी लावली. वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे अनेक ठिकाणी झाडे कोसळल्याची घटना घडली. कोल्हापुरातील करवीर तहसीलदार कार्यालयासमोरील भलंमोठं झाड कोसळलं. झाडाखाली अनेक दुचाकी आणि चारचाकी अडकल्याने नुकसान झालं आहे. तर अनेक ठिकाणी नाले ओसंडून वाहत होते. अचानक सुरू झालेल्या पावसामुळे रस्त्यावर विक्री करणाऱ्या विक्रेत्यांची तारांबळ उडाली. तर वाहनधारकांसह नागरिकांचे चांगलेच हाल झाले.

# धंगेकरांकडे पुण्यातील शिवसेनेची सूत्रे

## एकनाथ शिंदे यांच्याकडून महानगरप्रमुखपदी निवड

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटन मजबूत करण्याच्या दृष्टीने शहर शिवसेनेत (शिंदे) फेरबदल करण्यात आले आहेत. माजी आमदार रवींद्र धंगेकर यांची पुणे महानगरप्रमुखपदी नियुक्ती करून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शहरातील पक्षाची सूत्रे धंगेकर यांच्या हाती सोपविली आहेत. लवकरच दोन किंवा तीन शहरप्रमुख नेमले जाणार असून, धंगेकर यांच्या नेतृत्वाखाली शहरप्रमुख काम करणार आहेत.**



शहरातील सर्व आठही विधानसभा मतदारसंघांचे सर्वाधिकार धंगेकर यांना देण्यात आले आहेत. शहरप्रमुख हे धंगेकर यांच्या नेतृत्वाखाली काम पाहणार आहेत. त्यामुळे शहराची सर्व सूत्रे धंगेकर यांच्या हाती गेली असून, शिवसेनेचा कारभार 'कसब्या'तून चालणार असल्याचेही स्पष्ट झाले आहे. धंगेकर यांनी काही महिन्यांपूर्वी काँग्रेसमधून शिवसेनेमध्ये प्रवेश केला होता. शिवसेनेचे नेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत हा पक्ष प्रवेश झाला होता. शिवसेनेत दाखल झाल्याने धंगेकर यांच्याकडे कोणती जबाबदारी सोपविली जाणार, याबाबत सातत्याने कार्यकर्त्यांमध्ये चर्चा होत होती. मात्र, पदासाठी नव्हे, तर नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी पक्ष प्रवेश केल्याचे धंगेकर यांनी जाहीर केले होते.गेल्या महिन्यात शिवसेनेचे प्रदेश सचिव यांनी या संदर्भात पुणे दौरा केला होता. शहरप्रमुख प्रमोद ऊर्फ नाना भानगिरे यांच्यासमवेत त्यांनी या संदर्भात चर्चा केली होती. धंगेकर हे माजी आमदार असल्याने त्यांना कोणते पद देता येईल, याची चाचपणी करण्यात आली होती.

त्यानुसार त्यांची थेट पुणे महानगरप्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्याकडे शहरातील आठही विधानसभा मतदारसंघांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. संघटनात्मक बांधणी, प्रचार, महापालिका निवडणुकीची तयारी आणि विधानसभा मतदारसंघात स्थानिक नेतृत्व निर्माण करण्याची जबाबदारी धंगेकर यांच्याकडे असणार आहे.

येत्या चार महिन्यांत महापालिकेची निवडणूक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शहरातील शिवसेनेचे संघटनबांधणीचे आव्हान धंगेकर यांच्यापुढे असणार आहे.सर्व आठही मतदारसंघांची जबाबदारी माझ्याकडे असून, शिवसेना वाढीसाठी सर्वांना सोबत घेऊन काम केले जाईल. महानगरप्रमुख म्हणून नियुक्ती केल्याबद्दल पक्षाच्या सर्व वरिष्ठ नेत्यांचे आभार. या विश्वासाला पात्र ठरण्याचा प्रयत्न केला जाईल. शहरातील सर्व आठही विधानसभा मतदारसंघांचे सर्वाधिकार धंगेकर यांना देण्यात आले आहेत.

### शहराची सर्व सूत्रे धंगेकर यांच्या हाती


शहरप्रमुख हे धंगेकर यांच्या नेतृत्वाखाली काम पाहणार आहेत. त्यामुळे शहराची सर्व सूत्रे धंगेकर यांच्या हाती गेली असून, शिवसेनेचा कारभार 'कसब्या'तून चालणार असल्याचेही स्पष्ट झाले आहे.धंगेकर यांनी काही महिन्यांपूर्वी काँग्रेसमधून शिवसेनेमध्ये प्रवेश केला होता. शिवसेनेचे नेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत हा पक्ष प्रवेश झाला होता. शिवसेनेत दाखल झाल्याने धंगेकर यांच्याकडे कोणती जबाबदारी सोपविली जाणार, याबाबत सातत्याने कार्यकर्त्यांमध्ये चर्चा होत होती. मात्र, पदासाठी नव्हे, तर नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी पक्ष प्रवेश केल्याचे धंगेकर यांनी जाहीर केले होते.गेल्या महिन्यात शिवसेनेचे प्रदेश सचिव यांनी या संदर्भात पुणे दौरा केला होता.

# पावसामुळे शहरात २० ठिकाणी झाडे पडली

## अग्निशमन दलाच्या मुख्य नियंत्रण कक्षाकडून देण्यात आली माहिती

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहर व परिसरात मंगळवारी सायंकाळी झालेल्या पावसामुळे ३० ठिकाणी झाडे पडल्याची घटना घडली. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन झाडांच्या फांद्या हटविल्याने वाहतूक सुरळीत झाली.**



शहरात मंगळवारी दुपारी साडेतीननंतर पावसास सुरुवात झाली. सायंकाळी पावसाचा जोर वाढला. शहर परिसरातील वेगवेगळ्या भागांत झाडांच्या फांद्या कोसळल्या. झाडे, तसेच फांद्या कोसळल्याची माहिती अग्निशमन दलाच्या मुख्य नियंत्रण कक्षाला मिळाली. त्यानंतर शहरातील वेगवेगळ्या भागातील अग्निशमन केंद्रातील जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन तातडीने फांद्या हटविण्याचे काम सुरू केले. शहर परिसरात मंगळवारी रात्रीपर्यंत ३० ठिकाणी झाडे कोसळण्याच्या घटना घडल्या, अशी माहिती अग्निशमन दलाच्या मुख्य नियंत्रण कक्षाकडून देण्यात आली.येरवडा, कोरेगाव पार्क, धानोरी, टिंगरेनगर, एरंडवणे, उरळी देवाची, बावधन, मुकुंदनगर, हडपसर भागतील काळेपडळ, काळेबोराटेनगर, फातिमानगरसह वेगवेगळ्या भागांत झाडे पडल्याच्या घटना घडल्या. धनकवडीतील तीन हत्ती चौक परिसरात एका सोसायटीतील सीमाभिंत कोसळल्याची घटना घडली. सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही, अशी माहिती अग्निशमन दलातील अधिकाऱ्यांनी दिली.शहरात झालेल्या पावसामुळे वाहतूक संथगतीने सुरू होती.

वाहतूक नियोजनासाठी शहरातील प्रमुख रस्ते, तसेच चौकात वाहतूक पोलीस तैनात करण्यात आले होते. खड्डे, तसेच साचलेल्या पाण्यामुळे वाहतुकीचा वेग संथ झाल्याची माहिती वाहतूक पोलिसांनी दिली.शहरात मंगळवारी दुपारी साडेतीननंतर पावसास सुरुवात झाली. सायंकाळी पावसाचा जोर वाढला. शहर परिसरातील वेगवेगळ्या भागांत झाडांच्या फांद्या कोसळल्या. झाडे, तसेच फांद्या कोसळल्याची माहिती अग्निशमन दलाच्या मुख्य नियंत्रण कक्षाला मिळाली. त्यानंतर शहरातील वेगवेगळ्या भागातील अग्निशमन केंद्रातील जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन तातडीने फांद्या हटविण्याचे काम सुरू केले. शहर परिसरात मंगळवारी रात्रीपर्यंत ३० ठिकाणी झाडे कोसळण्याच्या घटना घडल्या, अशी माहिती अग्निशमन दलाच्या मुख्य नियंत्रण कक्षाकडून देण्यात आली.येरवडा, कोरेगाव पार्क, धानोरी, टिंगरेनगर, एरंडवणे, उरळी देवाची, बावधन, मुकुंदनगर, हडपसर भागतील काळेपडळ, काळेबोराटेनगर, फातिमानगरसह वेगवेगळ्या भागांत झाडे पडल्याच्या घटना घडल्या. धनकवडीतील तीन हत्ती चौक परिसरात एका सोसायटीतील सीमाभिंत कोसळल्याची घटना घडली. सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही, अशी माहिती अग्निशमन दलातील अधिकाऱ्यांनी दिली.शहरात झालेल्या पावसामुळे वाहतूक संथगतीने सुरू होती.

### ल वेगवेगळ्या भागांत फांद्या कोसळल्या

वाहतूक नियोजनासाठी शहरातील प्रमुख रस्ते, तसेच चौकात वाहतूक पोलीस तैनात करण्यात आले होते. खड्डे, तसेच साचलेल्या पाण्यामुळे वाहतुकीचा वेग संथ झाल्याची माहिती वाहतूक पोलिसांनी दिली.शहरात मंगळवारी दुपारी साडेतीननंतर पावसास सुरुवात झाली. सायंकाळी पावसाचा जोर वाढला. शहर परिसरातील वेगवेगळ्या भागांत झाडांच्या फांद्या कोसळल्या.

## कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यांचे प्रश्न

# सोडवण्यासाठी पुढाकार घ्या!

### राज्य सफाई कर्मचारी आयोग अध्यक्षांची आयुक्तांना सूचना

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**‘शहराच्या आरोग्याची काळजी सफाई कर्मचारी घेत असतात. स्वच्छतेचे काम करताना त्यांना अनेकवेळा अडचणींना सामोरे जावे लागत असते. त्यांच्या अडीअडचणी तातडीने सोडवून मानवतेच्या दृष्टिकोनातून त्यांच्या प्रश्नांसाठी प्रशासनाने पुढाकार घ्यावा,’ अशी सूचना राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर यांनी दिली. महानगरपालिका आस्थापनावरील सफाई कर्मचाऱ्यांसोबत कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची काळजी महानगरपालिका प्रशासनाने घ्यावी, असेही ते म्हणाले.**





पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत मंगळवारी (दि २०) राज्य सफाई कर्मचारी आयोगाची बैठक शेरसिंग डागोर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, उपायुक्त अण्णा बोदडे, मनोज लोणकर, सचिन पवार, विशेष अधिकारी किरण गायकवाड, आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे यांच्यासह क्षेत्रीय अधिकारी, आरोग्य निरीक्षक, सफाई कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी अ‍ॅड.सागर चरण, गणेश भोसले, संजय जगदाळे, प्रताप सोंळखी, करण चव्हाण, निखील बैद, राजेश राजोरिया, सोनाथ बैद, प्राची साळवे, वाल्मिकी समाज अध्यक्ष विष्णू चावरिया आदी बैठकीला उपस्थित होते. शेरसिंग डागोर म्हणाले, ‘सफाई कर्मचाऱ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. त्यासाठी शासनाने अनेक धोरणे राबवली आहेत. त्या धोरणांचा सर्वांकष अभ्यास करून अधिकाधिक योजना, हक्क आणि अधिकार सफाई कर्मचारी आणि त्यांच्या वारसांना मिळवून देण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने एक पाऊल पुढे यावे. शोषित, वंचित घटकातून सफाई कर्मचारी येत असतात. या कर्मचाऱ्यांच्या वारसांना त्यांच्या शैक्षणिक योग्यतेप्रमाणे नोकरी द्यावी. शासनाचे आवश्यक लाभ सफाई कर्मचाऱ्यांना मिळवून देण्यासाठी महानगरपालिकेने प्रयत्न करावेत. सफाई कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी स्वतंत्र नोडल अधिकाऱ्याची नेमणूक करून कार्यवाही करावी,’ असे निर्देशही त्यांनी दिले.

#### सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्याला प्राधान्य द्या

सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्याला महानगरपालिकेने प्राधान्य द्यावे. धन्वंतरी सारख्या वैद्यकीय विमा योजनांचा त्यांना विना त्रास आणि कोणताही आर्थिक भार त्यांच्यावर न टाकता लाभ देणे गरजेचे आहे. त्यांच्या शैक्षणिक दर्जा उंचवावा, यासाठी महानगरपालिका प्रशासनाने प्रयत्न केले पाहिजेत. सफाई कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीचे प्रश्न तातडीने सोडवण्यात यावेत. अनुकंपाचे प्रश्न विहित मुदतीमध्ये सोडवण्यात यावेत. लाड पागे समितीच्या शिफारसीचे तंतोतंत पालन करून त्यांना त्याचे हक्क, अधिकार द्यावेत, असे निर्देशही शेरसिंग डागोर यांनी दिले.

#### नोडल अधिकारी नियुक्त करा

सफाई कर्मचाऱ्यांच्या निवासाबाबत शासनाचा निर्णय आहे. शासनाच्या निर्णयाची अंमलबजावणी करून सफाई कर्मचाऱ्यांच्या निवासाचा देखील महानगरपालिकेने प्रश्न सोडवावेत. सफाई कर्मचाऱ्यांचे वेतन, त्यामधील त्रुटी दूर करणे, शासनाचे आवश्यक लाभ सफाई कर्मचाऱ्यांना मिळवून देण्यासाठी महानगरपालिकेने प्रयत्न करावेत. सफाई कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी स्वतंत्र नोडल अधिकाऱ्याची नेमणूक करून कार्यवाही करावी, असेही शेरसिंग डागोर म्हणाले. बैठकीमध्ये सफाई कर्मचारी संघटनांचे प्रतिनिधी, लाभार्थी यांनी विविध समस्या मांडल्या. या समस्यांचे निराकरण तातडीने महानगरपालिका प्रशासनाने करावे, अशा सूचना यावेळी त्यांनी दिल्या.

#### सफाई कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांना गती - आयुक्त

यावेळी आयुक्त सिंह यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने सफाई कर्मचाऱ्यांसाठी राबवण्यात येत असलेल्या विविध योजनांची माहिती दिली. सफाई कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी महानगरपालिका कटीबद्ध आहे. महापालिकेकडे सध्या सफाई कर्मचाऱ्यांचे जे प्रश्न, समस्या प्रलंबित आहेत, त्या सोडवण्यासाठी प्रशासकीय पातळीवर गतीने काम सुरु आहे. जिथे तांत्रिक अडचणी येत आहेत, त्यातूनही मार्ग काढण्याचे प्रयत्न प्रशासकीय पातळीवर सुरु आहेत. यासाठी सफाई कामगारांच्या संबंधित असणाऱ्या सर्व परिपत्रकांचा अभ्यास केला जात आहे, असेही आयुक्त सिंह यांनी सांगितले.

## पीएमआरडीए’च्या गृहप्रकल्पातील ६० टक्के सदनिका भाड्याने

### पीएमआरडीएकडून सोसायटीधारकांना माहिती कळविण्याची सूचना

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पीएमआरडीने उभारलेल्या गृहप्रकल्पात ६० टक्क्यांहून अधिक सदनिका भाडेतत्त्वावर देण्यात आल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे आल्या होत्या. त्याअनुषंगाने सोसायटीतील किती सदनिकांमध्ये भाडेकरू राहत आहेत, याबाबतची माहिती तुम्हीच कळवावी, असे पत्रक पीएमआरडीएने प्रत्येक सोसायटीधारकांना काढले आहे.**





प्राधिकरणाने उभारलेल्या गृहप्रकल्पातील सदनिका या लॉटरीच्या माध्यमातून लाभार्थ्यांना दिल्या आहेत. मात्र, अनेक सदनिका भाड्याने दिल्या असल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रकल्पातील जवळपास ६० टक्क्यांहून अधिक सदनिका या भाडेतत्त्वावर देण्यात आल्या आहेत. याबाबत वेगवेगळ्या सहकारी संस्थेचे अध्यक्ष व अन्य पदाधिकारी यांनी तक्रार केली होती. तसेच, पीएमआरडीए कार्यालयासमोर आंदोलनाचा इशारा दिला होता. दरम्यान, त्याची दखल घेत पीएमआरडीएच्या अभियांत्रिकी आणि जमीन व मालमत्ता विभागाने बैठक घेतली. त्यानुसार, भाड्याने दिलेल्या सदनिकांवर कारवाई करण्यात येणार आहे. याप्रकरणी सदनिकाधारकांना त्यांच्या सोसायटीमध्ये राहणाऱ्या भाडेकरूंची माहिती मागवण्यात आली आहे. पेठ क्रमांक १२ येथील फेज १, फेज २ याअंतर्गत सदनिकाधारकांनी सदनिका भाड्याने दिलेल्या आहेत.

#### करार रद्द करणार

पीएमआरडीएअंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सदनिका घेतली असल्यास, करारनुसार ते घर दहा वर्षांपर्यंत विकता अथवा हस्तांतर करण्यात येत नाही. तसेच, प्राधिकरणाच्या नियमानुसार ते भाड्याने देता येत नाही; मात्र गृहप्रकल्पात ६० टक्क्यांपेक्षा अधिक सदनिका या भाडेतत्त्वावर दिल्या असल्याचे येथील रहिवाशांचे म्हणणे आहे. त्यामुळे जमीन व मालमत्ता विभागाने यापूर्वी नोटीस काढली होती. मात्र, तरीही संबंधित सदनिकाधारकांनी त्याची दखल घेतली नसल्याने अखेर अशा सदनिकाधारकांचे आर्टिकल ऑफ अ‍ॅग्रिमेंट रद्द करण्यात येईल, असे पत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### भगवंताच्या स्मृतीत प्रपंच करावा.

दु:खाचे मूळ कारण । स्मरणांतून गेला रघुनंदन ॥ सर्व दु:खांचे मूळ । भगवंतापासून झालो दूर ॥ रामावाचून प्रपंचात नाही सुख। कारण प्रपंच मूर्तिमंत आहे दु:ख ॥ कोळशाने हात काळा झाला। त्याने दु:खी कष्टी झाला । ज्याचा जो धर्म तो त्याने पाळला ।आपण मात्र नाही ओळखला ।तैसा प्रपंच दु:खाचा झाला ।भगवंतावाचून वाया गेला ॥ जगातील ऐश्वर्य, मानाची प्राप्ति । रामरायाविण समाधानाला न देती ॥ जे जे वैभव जगती । ते ते आले हाती । वाया सर्व जाते । हाती न येता रघुपति ॥ परमात्म्याचे विस्मरण । हेच बीज जाणावे मूळ कारण ॥ काळजी, चिंता, अहंकार, । भीति, तळमळ फार, । हा झाला त्याचाच विस्तार -॥ तात्पर्य, कडू बी पेरले । त्याचे गोड फळ नाही आले ॥ काळजी आणि भीति । भगवंताच्या विस्मृतीत जन्मती ॥ म्हणून प्रपंचातील लाभ आणि हानि । परमात्म्याला दूरच करतील दोन्ही ॥ व्यवहार, सद्वासना, सदाचरण । लौकिक, संतति, संपत्ति, शास्त्राचे मनन, । सर्व काही रामाविण वाटे शून्य ॥ संतति, संपत्ति, लौकिकाची प्राप्ति । सर्व वैभव जरी आले हाती । तरी रामाविण आहे फजिती ॥ प्रपंची ठेवता दक्षता । न विसंबे रघुनाथा । तोच प्रपंची सुखी जाणा ॥ प्रपंच करावा सर्वांनी जपून । पण रामाचे स्मरण राखून ॥ सर्वस्वी व्हावे भगवंताचे । मी-माझे सोडोनि साचे ॥ भगवंताचे होऊन राहणे । याहून दुजे काही न करणे ॥ ‘मी कर्ता नव्हे’ जाणून करी कर्म । त्याला बाधेना कलीचा मार्ग ॥ दुष्ट अभिमानाला न पडावे बळी। त्याचा मालक होईल कलि ॥ कलि जेथे शिरला । त्याने राम दूर केला ॥ भगवंताचे स्मरण सांभाळून । कोणताही करावा व्यवसाय जपून । हेच प्रापंचिकास मुख्य साधन ॥ कर्ता मी नव्हे, कर्ता राम, । ही मनात जाणून खूण । करावा व्यवहार जतन ॥ रामापरते हित । मानी त्याचा होई घात । जोवर ‘ कर्ता मी ’ हे ध्यानी। तोवर मन न लागले राघवचरणी ॥ मीपणा टाकावा, अभिमान सोडावा । सुख येईल त्याचे मागे हा विश्वास बाळगावा ॥ ज्याने केले सर्वच रामास अर्पण । तेथे मीपणास नाही ठाव ठिकाण ॥ पापाचे न व्हावे आपण धनी । कर्ता राम जाणून मनी ॥ रामसेवेपरते हित । सत्य सत्य नाही या जगात ॥ म्हणून रामास व्हावे अनन्य शरण । दु:ख दूर व्हावयास मुख्य साधन ॥ मनाने होऊन जावे भगवंताचे । त्याने खास केले सार्थक जन्माचे ॥ म्हणून त्याचे भाग्य थोर जाणा । ज्याने जोडला रामराणा ॥ ज्याने देह केला रामास अर्पण। धन्य धन्य त्याचे जीवन ॥ बोधवचन:- अखंड असावे भगवंताचे स्मरण। तो दूर करील दुःखाचे कारण॥

# पाकमधील ‘सिक्रेट किलर’ ने ठोकले 15 जहाल दहशतवादी !



‘स्टेट’मेंट

अधिकराव दिवे-पाटील

संस्थापक, संपादक



**पाकिस्तानमधील दहशतवादी तयार करणारी जहाल संघटना म्हणजे लष्कर-ए-तोयबा ! शेकडो युवकांना ताब्यात घ्यायचे..त्यांना दहशतवादी प्रशिक्षण द्यायचे आणि हातामध्ये अत्याधुनिक शस्त्रे देऊन त्यांना काश्मीरमध्ये किंवा भारतात पाठवायचे, हे प्रामुख्याने या दहशतवादी संघटनेचे उद्योग ! अशा या संघटनेचा एक म्होरक्या पाकिस्तानात टिपला गेला आणि समोर चर्चा सुरू झाली ती ‘सिक्रेट किलर’ची.. अर्थात्, अज्ञात हल्लेखोराची!**

### ‘सिक्रेट किलर’ चा दणका..

पहलगाममध्ये हिंदूंवर झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर भारताने ‘ऑपरेशन सिंदूर’ हाती घेऊन पाकव्याप्त काश्मीर आणि प्रमुख शहरांमध्ये सुरू असलेली दहशतवादी केंद्रे उद्ध्वस्त केली. त्या कारवाईत किमान दीडशे दहशतवाद्यांचा खात्मा झाल्याचे पाकिस्तानने कबूल केले आहे. भारताच्या हल्ल्याच्या भीतीने बहुतेक दहशतवादी पाकिस्तानच्या अन्य भागात आश्रयाला गेले आहेत. ‘सिक्रेट किलर’ चा त्या ठिकाणी मोठा बोलबाला असून त्याचा शोध आता पाकिस्तान घेत आहे.

### ‘सिक्रेट किलर’ चा आश्रयदाता?

भारताने दहशतवाद्यांचे अड्डे या महिन्यात उद्ध्वस्त केले आहेत, परंतु हा ‘सिक्रेट किलर’ गेले काही महिने पाकिस्तानात सक्रिय असून त्याने आत्तापर्यंत अतिशय जहाल अशा पंधरापेक्षा जास्त दहशतवाद्यांना ठोकले आहे. त्यामुळे दहशतवाद्यांना भारताबरोबरच या ‘सिक्रेट किलर’ ची जबरदस्त भीती आहे. त्याचा ‘गॉडफादर’ कोण, याचाही आता शोध सुरू झाला आहे.

### दहशतवाद्यांची यादी दिली.. पण,

‘ऑपरेशन सिंदूर’ नंतर दहशतवाद संपवण्याची मोहीम भारताने हाती घेतली आणि पाकिस्तानला कट्टर दहशतवाद्यांची यादी सोपविधी.. त्यामध्ये कुख्यात डॉन दाऊद इब्राहिम, अझर मसूद, हाफिज सईद, सलाउद्दीन या दहशतवाद्यांना भारताच्या ताब्यात द्या, असे पाकिस्तानला सुनावले. पण, पाकिस्तान सरकारवरच दहशतवाद्यांचा एवढा कब्जा आहे, की त्यांच्या लष्कराच्या पाठिंब्यावर हेच दहशतवादी सरकार चालवतात की काय अशी शंका यावी !

### सैफुल्लाह खालिदचा खात्मा..

दहशतवादाचे काय करायचे, याचे पूर्ण नियोजन सुरू असतानाच अचानक एक बातमी येऊन टपकली..सैफुल्लाह खालीदचा खात्मा ! एका अज्ञात मारेकऱ्याने त्याला ठार केल्याचा पाकिस्तानच्या वृत्तवाहिन्यांवरून सांगण्यात आले. हा ‘सिक्रेट किलर’ कोण ? याचा सुगावा मात्र कोणालाच लागला नाही. नंतर सांगण्यात आले, की आतापर्यंत १५ पेक्षा अधिक क्रूर दहशतवाद्यांना या ‘सिक्रेट किलर’ ने यमसदनी पाठवले आहे. पाकमधील सिंध प्रांतात रविवारी रात्री ‘लष्कर- ए- तोयबा’ चा टॉप कमांडर सैफुल्लाह खालिदला अज्ञात हल्लेखोराने ठार केल्याच्या वृत्ताने संपूर्ण अंडरवर्ल्ड हादरून गेले.

### खालीदचे मुख्यालय नेपाळमध्ये..

दहशतवादी खालिद दीर्घकाळापासून नेपाळमधून दहशतवादी कारवाया हाताळत होता. परंतु, हत्येच्या वेळी तो सिंध प्रांतात रजाउल्लाह नावाने लपून राहिला होता. भारतात झालेल्या तीन मोठ्या हल्ल्यात खालिदचा समावेश होता. त्यामध्ये भारताच्या संसदेवर झालेल्या हल्ल्याचाही समावेश आहे, हे एक वैशिष्ट्य!

### भारतात हिंसाचाराचे मोठे ‘टास्क’..

पाकिस्तानच्या लष्कराने खालिदला भारतात हल्ल्याची तयारी करण्याचा ‘टास्क’ दिला होता. त्याला आधुनिक शस्त्रास्त्रे देखील पुरवण्यात आली होती. त्यानंतर तो नेपाळमध्ये अनेक वर्ष आपला तळ बनवून तिथून भारतात हल्ल्याची तयारी करत होता. परंतु, जेव्हा भारताच्या गुप्तचर यंत्रणेला याची माहिती मिळाली, तेव्हा तो नेपाळमधून पळून पाकिस्तानात जाऊन लपल्याचे लक्षात आले होते. तसे पाहिले तर खालिद हा भारताचा पहिला ‘मोस्ट वॉन्टेड’ दहशतवादी नक्कीच नाही, तरीपण तो भारताला पाहिजेच होता, हे निश्चित! याआधीही अशाच ‘सिक्रेट किलर’ने भारताचे अनेक शत्रू आणि कट्टर दहशतवाद्यांना याच पॅटर्नने ठार केले आहे.

### हल्लेखोर अज्ञात,खल्लास..

थोडासा विचार केला तर नक्की लक्षात येईल, की गेल्या काही महिन्यात पाकिस्तानात १५ पेक्षा अधिक दहशतवादी अज्ञात हल्ल्यात ठार झालेत. विशेष म्हणजे, त्यातील बहुतांश दहशतवादी भारतातील हल्ल्यात सहभागी होते. हे दहशतवादी लष्कर ए तोयबा, जैश ए महम्मद तसेच हिजबुल मुजाहिद्दीन सारख्या दहशतवादी संघटनेत सहभागी होते. त्यातील एक मोठे नाव अबू कताल जो सर्वात जहाल दहशतवादी मानला गेला होता. जम्मू - काश्मीरातील अनेक हल्ल्यात त्याचा सहभाग होता. याचवर्षी मार्च महिन्यात पाकिस्तानात झेलम परिसरात त्याला अज्ञात हल्लेखोरांनी ठार केले. ‘एन आय ए’ च्या यादीत तो मॉस्ट वॉन्टेड दहशतवादी होता.

### लतीफ आणि अदनान अहमद..

अज्ञाताच्या अशाच काही हल्ल्यात शाहिद लतीफ आणि अदनान अहमदही मारले गेले होते. सध्या भारताच्या हिटलिस्टवर सर्वात अग्रस्थानी असलेल्या हाफिज सईदचा हा अत्यंत जवळचा आणि लष्करातील टॉप कमांडर होता. डिसेंबर २०२३ मध्ये कराचीत अज्ञात हल्लेखोरांनी त्याची हत्या केली होती.

### हाफिज सईद चे उजवे - डावे..

हाफीज सईदचा जवळचा दहशतवादी आणि पॉलिटिकल विंगचा नेता मौलाना काशिफ अली हा देखील अशाच अज्ञाताच्या हल्ल्यात मारला गेला. फेब्रुवारी २०२५ मध्ये पाकिस्तानच्या खैबर पख्तूनख्वात त्याची गोळी झाडून हत्या करण्यात आली. मुफ्ती शाह मीर यालाही मार्च २०२५ मध्ये बलुचिस्तान येथील तुरबत शहरात अज्ञातांनी गोळी झाडून ठार केले.

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# जरांगेने समाजाचं नुकसान केलं!

## मंत्रिपद स्वीकारताच भुजबळ यांची जरांगे पाटील यांच्यावर टीका



### मनोज जरांगेंनी काय म्हटलं होतं?

अजित पवार जातीयवादी लोकं पोसायचं काम करत आहेत, असं मनोज जरांगे म्हणाले. तसेच अजित पवार प्रचंड मोठी चूक करत आहेत. असा थेट इशारा देखील मनोज जरांगे यांनी दिला. राज्यातील महायुती सरकारमध्ये आणखी एका मंत्र्याचा समावेश झाला असून राजभवन येथे आज राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि आमदार छगन भुजबळ यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. यापूर्वी झालेल्या महायुती सरकारच्या शपथविधी सोहळ्यात छगन भुजबळ यांचं नाव वगळण्यात आल्याने अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला होता. तर, भुजबळ यांनी देखील जाहीरपणे नाराजी बोलून दाखवली होती. मात्र, धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यानंतर आता छगन भुजबळ यांची पुन्हा मंत्रिमंडळात वर्णी लागली आहे.

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**अजित पवार हे आमच्या पक्षाचे अध्यक्ष आहेत. त्यांनी निर्णय घेतला म्हणूनच मी मंत्रिमंडळात आलो. अजित पवार, सुनील तटकरे, प्रफुल पटेल आणि संपूर्ण राष्ट्रवादी पक्षाचा मी आभारी आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचाही आभारी आहे असं छगन भुजबळ यांनी म्हटलं आहे.**

आमचे किती मतभेद असले तरीही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गट हा मी सोडलेला नव्हता. आगामी काळातही आमच्या पक्षाला चांगलं यश मिळावं म्हणून आम्ही प्रयत्न करणार आहोत. मंत्रिपदाची जबाबदारी दिली गेली आहे. खातं कुठलं? अजून काही जबाबदारी द्यायची असेल तर तो निर्णय मुख्यमंत्र्यांचा असतो असंही भुजबळ म्हणाले आहेत. त्यानंतर त्यांनी मनोज जरांगेंबाबतही भाष्य केलं."मनोज जरांगेने चुका नाही तर खिळे केले आहेत. महाराष्ट्रातल्या संपूर्ण मराठा समाजाचं प्रचंड नुकसान केलं आहे. गावागावांमध्ये त्यामुळे मराठा समाजालाही निश्चितपणे त्रास झाला. मराठा समाज हा सगळ्यात मोठा बांधव म्हणून महाराष्ट्रात राहतो, पण ह्या जरांगेच्या कर्तृत्वामुळेच निश्चितपणे मराठा समाजालाच त्रास झाला आहे." असं भुजबळ यांनी म्हटलं आहे. छगन भुजबळ यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली किंवा नाही घेतली हा त्यांचा पक्षांतर्गत प्रश्न आहे. छगन भुजबळ मंत्री झाले याचा आम्हाला काहीच फरक पडत नाही. अजित पवार जातीयवादी लोकं पोसायचं काम करत आहेत, असं मनोज जरांगे म्हणाले. तसेच अजित पवार प्रचंड मोठी चूक करत आहेत. याच्या परिणामाला त्यांना सामोरे जावं लागेल, असा थेट इशारा देखील मनोज जरांगे यांनी दिला.राज्यातील महायुती सरकारमध्ये आणखी एका मंत्र्याचा समावेश झाला असून राजभवन येथे आज राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि आमदार छगन भुजबळ यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. यापूर्वी झालेल्या महायुती सरकारच्या शपथविधी सोहळ्यात छगन भुजबळ यांचं नाव वगळण्यात आल्याने अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला होता. तर, भुजबळ यांनी देखील जाहीरपणे नाराजी बोलून दाखवली होती. मात्र, धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यानंतर आता छगन भुजबळ यांची पुन्हा मंत्रिमंडळात वर्णी लागली आहे. आमचे किती मतभेद असले तरीही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गट हा मी सोडलेला नव्हता. आगामी काळातही आमच्या पक्षाला चांगलं यश मिळावं म्हणून आम्ही प्रयत्न करणार आहोत. मंत्रिपदाची जबाबदारी दिली गेली आहे. खातं कुठलं? अजून काही जबाबदारी द्यायची असेल तर तो निर्णय मुख्यमंत्र्यांचा असतो असंही भुजबळ म्हणाले आहेत. त्यानंतर त्यांनी मनोज जरांगेंबाबतही भाष्य केलं."मनोज जरांगेने चुका नाही तर खिळे केले आहेत. महाराष्ट्रातल्या संपूर्ण मराठा समाजाचं प्रचंड नुकसान केलं आहे. गावागावांमध्ये त्यामुळे मराठा समाजालाही निश्चितपणे त्रास झाला. मराठा समाज हा सगळ्यात मोठा बांधव म्हणून महाराष्ट्रात राहतो, पण ह्या जरांगेच्या कर्तृत्वामुळेच निश्चितपणे मराठा समाजालाच त्रास झाला आहे." असं भुजबळ यांनी म्हटलं आहे. छगन भुजबळ यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली किंवा नाही घेतली हा त्यांचा पक्षांतर्गत प्रश्न आहे.

# राज्याचं नवीन गृहनिर्माण धोरण जाहीर!

## नवीन धोरणांतर्गत राज्यात 70 हजार कोटीची गुंतवणूक



### मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णय

धुळे या प्रकल्पाच्या ५,३२९.४६ कोटी रुपयांच्या सुधारित खर्चास मान्यता देण्यात आली. या प्रकल्पामुळे ५२,७२० हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार. अरुणा मध्यम प्रकल्पांतर्गत मौजे हेत, तालुका वैभववाडी जिल्हा सिंधुदुर्ग या प्रकल्पासाठी २०२५.६४ कोटींच्या सुधारित खर्चास मान्यता देण्यात आली. यामुळे ५,३१० हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे.या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, नवनिर्वाचित मंत्री भुजबळांसह सर्व मंत्री उपस्थित होते. या बैठकीत विविध महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यावेळी प्रामुख्याने राज्याचं नवं गृहनिर्माण धोरण जाहीर करण्यात आलं.या मंत्रिमंडळ बैठकीत जलसंपदा विभागाअंतर्गत चार प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली. तसेच विधी व न्याय विभागक, नगरविकास विभाग, उद्योग विभागांच्या प्रत्येकी एका प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली.

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (अजित पवार) आमदार छगन भुजबळ यांचा आज (२०) राज्याच्या मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला आहे. काही वेळापूर्वी भुजबळांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. पाठोपाठ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली.**

या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, नवनिर्वाचित मंत्री भुजबळांसह सर्व मंत्री उपस्थित होते. या बैठकीत विविध महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यावेळी प्रामुख्याने राज्याचं नवं गृहनिर्माण धोरण जाहीर करण्यात आलं.या मंत्रिमंडळ बैठकीत जलसंपदा विभागाअंतर्गत चार प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली. तसेच विधी व न्याय विभागक, नगरविकास विभाग, उद्योग विभागांच्या प्रत्येकी एका प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली. आजच्या बैठकीत एकूण आठ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.'माझे घर-माझे अधिकार' या ब्रीदवाक्यासह राज्याचे नवीन गृहनिर्माण धोरण जाहीर करण्यात आले आहे. याअंतर्गत ७० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार आहे. झोपडपट्टी पुनर्वसन ते पुनर्विकास असा सर्वांगिण कार्यक्रम यामध्ये सामावून घेण्यात आला आहे. अल्प उत्पन्नधारक, ज्येष्ठ नागरिक, महिला, औद्योगिक कामगार आणि विद्यार्थी यांच्या विशिष्ट गरजांचा या धोरणात प्राधान्याने विचार करण्यात आला आहे.उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या अंतर्गत धोरण कालावधी संपुष्टात आलेल्या धोरणांतर्गत विभागाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली.बायोमिथेनेशन तंत्रज्ञानाचा वापर करुन कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्पाची उभारणी करण्यासाठी महानगर गॅस लिमिटेड कंपनीला बृहन्मुंबई महापालिकेच्या अखत्यारीतील देवनार येथील भूखंड सवलतीच्या दरात भाडेपट्ट्याने उपलब्ध करुन देणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) स्थापन करण्याचा निर्णय आज घेण्यात आला.

# 'ऑपरेशन सिंदूर'वर ठोस भूमिका मांडा!

## परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांची सर्वपक्षीय शिष्टमंडळांना सूचना

| नवी दिल्ली |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**'ऑपरेशन सिंदूर'अंतर्गत भारताने केलेली लष्करी कारवाई फक्त दहशतवाद्यांविरोधात होती, हा प्रमुख संदेश आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवण्यासाठी सर्वपक्षीय शिष्टमंडळे ३५हून अधिक देशांना भेटी देणार आहेत. सात शिष्टमंडळांपैकी तीन शिष्टमंडळातील सदस्यांना मंगळवारी परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी तपशीलवार माहिती देत ठोस भूमिका मांडण्याची सूचना केली.**



ही शिष्टमंडळे विविध देशांमध्ये जाणार आहेत. त्यामुळे कुठल्या देशातील सरकारसमोर कुठले मुद्दे प्राधान्याने मांडले पाहिजेत, याची दिशा मिस्रींच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीमध्ये निश्चित केल्याचे समजते. संसदेत झालेल्या बैठकीत परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी तीन शिष्टमंडळांतील सदस्यांना प्रामुख्याने पाकिस्तानकडून भारतासंदर्भात पसरवल्या गेलेल्या गैरसमजांची माहिती दिली असून त्यासंदर्भात बाजू मांडण्याची सूचना केली. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये पाकिस्तानातील दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त करण्यासाठी लष्करी कारवाई केली गेली. ही कारवाई पाकिस्तानी नागरिक वा लष्कराविरोधात नव्हती, हा संदेश आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताच्या वतीने दिला जाणार आहे. पाकिस्तानमधून दहशतवादाला कसे खतपाणी घातले जाते, हा दुसरा प्रमुख मुद्दा अधोरेखित केला जाणार असल्याचे समजते. सर्वपक्षीय शिष्टमंडळांमध्ये सहभागी होण्यास नकार देणाऱ्या तृणमूल काँग्रेसने मंगळवारी घूमजाव केले. तृणमूल काँग्रेसचे लोकसभेतील खासदार युसूफ पठाणऐवजी आता पक्षाचे वरिष्ठ नेता व खासदार अभिषेक बॅनर्जी हे संजय झा यांच्या शिष्टमंडळाचे सदस्य असतील.

केंद्र सरकारने पक्षाला न विचारता शिष्टमंडळात विविध पक्षांच्या खासदारांचा समावेश करणे योग्य नव्हे. खासदारांचा समावेश करण्यापूर्वी पक्षाला विचारायला हवे होते, अशी भूमिका तृणमूल काँग्रेसने घेतली होती. मात्र, देशाचा मुद्दा असल्याने आम्ही शिष्टमंडळामध्ये सहभागी होऊ, असे अभिषेक बॅनर्जी यांनी सोमवारी स्पष्ट केले होते.पाकिस्तान दहशतवाद्यांना भारताविरोधात रसद पुरवत असून विविध स्तरांवर पाठिंबा देत आहे, हा मुद्दा वेगवेगळ्या देशांच्या सरकारांसमोर मांडला जाणार असून त्यादृष्टीने शिष्टमंडळातील सदस्यांना माहिती देण्यात आल्याचे समजते.ऑपरेशन सिंदूर'नंतर भारत व पाकिस्तान यांच्यामधील शस्त्रसंधीसाठी अमेरिकेने मध्यस्थी केलेली नाही. पाकिस्तानने शस्त्रसंधीची विनंती केल्यानंतर भारताने शस्त्रसंधी केल्याचा मुद्दाही शिष्टमंडळाकडून मांडला जाणार असल्याचे सांगण्यात आले. पाकिस्तानी प्रसारमाध्यमांतून चुकीचे मुद्दे मांडले जात आहेत. त्याचा प्रतिवाद करण्यासाठी भारत आपली बाजू मांडणार असल्याचे भाजप नेते एस. एस. अहलुवालिया म्हणाले. ही शिष्टमंडळे विविध देशांमध्ये जाणार आहेत.

त्यामुळे कुठल्या देशातील सरकारसमोर कुठले मुद्दे प्रामुख्याने मांडले पाहिजेत, याची दिशा मिस्रींच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीमध्ये निश्चित केल्याचे समजते. संसदेत झालेल्या बैठकीत परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी तीन शिष्टमंडळांतील सदस्यांना प्रामुख्याने पाकिस्तानकडून भारतासंदर्भात पसरवल्या गेलेल्या गैरसमजांची माहिती दिली असून त्यासंदर्भात बाजू मांडण्याची सूचना केली. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये पाकिस्तानातील दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त करण्यासाठी लष्करी कारवाई केली गेली. ही कारवाई पाकिस्तानी नागरिक वा लष्कराविरोधात नव्हती.

### दहशतवादाला खतपाणी घातले जाते

आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताच्या वतीने दिला जाणार आहे. पाकिस्तानमधून दहशतवादाला कसे खतपाणी घातले जाते, हा दुसरा प्रमुख मुद्दा अधोरेखित केला जाणार असल्याचे समजते. सर्वपक्षीय शिष्टमंडळांमध्ये सहभागी होण्यास नकार देणाऱ्या तृणमूल काँग्रेसने मंगळवारी घूमजाव केले. तृणमूल काँग्रेसचे लोकसभेतील खासदार युसूफ पठाणऐवजी आता पक्षाचे वरिष्ठ नेता व खासदार अभिषेक बॅनर्जी हे संजय झा यांच्या शिष्टमंडळाचे सदस्य असतील. केंद्र सरकारने पक्षाला न विचारता शिष्टमंडळात विविध पक्षांच्या खासदारांचा समावेश करणे योग्य नव्हे. खासदारांचा समावेश करण्यापूर्वी पक्षाला विचारायला हवे होते.

---

# मदरशांमध्ये शिकवला जाणार ऑपरेशन सिंदूरचा धडा

## संरक्षण मंत्र्यांच्या भेटीनंतर मदरसा बोर्डाच्या अध्यक्षांची घोषणा

| नवी दिल्ली |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**उत्तराखंड मदरसा बोर्डाच्या अध्यक्षांनी मंगळवारी घोषणा केली की, पाकिस्तान व पाकव्याप्त जम्मू आणि काश्मीरमधील दहशतवादी ठिकाणांवर भारतीय लष्कराने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून केलेली कारवाई, हा राज्यातील मदरशांच्या अभ्यासक्रमामध्ये शिकवले जाणार आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्याशी झालेल्या बैठकीनंतर अध्यक्ष मुफ्ती शमून कासमी यांनी ही घोषणा केली. त्यांनी सांगितले की, ऑपरेशन सिंदूरबाबतचा धडा लवकरच अभ्यासक्रमात समाविष्ट केला जाईल.**




"आम्ही संरक्षणमंत्र्यांना भेटलो आणि ऑपरेशन सिंदूरबद्दल त्यांचे आणि पंतप्रधानांचे अभिनंदन केले. उत्तराखंडमधील मदरशांना मुख्य प्रवाहात आणण्याच्या आमच्या मोहिमेचा एक भाग म्हणून, आम्ही अभ्यासक्रमात ऑपरेशन सिंदूरचा समावेश करणार आहोत," असे कासमी यांनी सामगितले.काँग्रेसला लक्ष्य करत ते म्हणाले की, पक्षाने "समुदायाला एकाकी पाडले असून, मुख्य प्रवाहापासून दूर नेले आहे. मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांच्या नेतृत्वाखाली, आम्ही मसरशांमध्ये ऑपरेशन सिंदूरबाबतचा धडा शिकवला जाईल याची खात्री करू. आम्ही मुलांना ऑपरेशन सिंदूर काय होते आणि ते का आवश्यक होते हे शिकवू. ऑपरेशन सिंदूर आवश्यक होते कारण पाकिस्तान हा एक दुष्ट देश आहे आणि त्यांनी आपल्या नागरिकांचे जीव घेतल्यामुळे त्यांना धडा शिकवावा लागला.२०१६ अंतर्गत, मदरसा बोर्ड अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, सूचनात्मक साहित्य लिहून देऊ शकते आणि अभ्यासक्रमाच्या पुस्तकांसाठी हस्तलिखिते देखील तयार करू शकते. मदरसा बोर्डाच्या अध्यक्षांनी यापूर्वीच घोषणा केली होती की, हिंदू महाकाव्ये, महाभारत आणि रामायण यांच्यासोबत मदरशांमध्ये संस्कृत भाषा शिकवण्यास सुरुवात करणार आहेत. पण, याला अद्याप सुरुवात झालेली नाही.दरम्यान, राज्य सरकार मदरसा बोर्ड किंवा शिक्षण विभागाकडून मान्यता प्रमाणपत्राशिवाय चालणाऱ्या मदरशांवर मोहीम राबवत आहे.

### दहशतवाद्यांचे 9 तळ उद्ध्वस्त

. डिसेंबर २०२४ मध्ये मुख्यमंत्री धामी यांनी या संदर्भात निर्देश दिल्यापासून राज्यात १८० हून अधिक मदरसे सील करण्यात आले आहेत.जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी दहशतवाद्यांनी हल्ला केला होता. यामध्ये एका परदेशी पर्यटकासह २५ पर्यटकांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर भारताने कठोर कारवाई करत ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तान व पाकव्याप्त जम्मू आणि काश्मीरमधील दहशतवाद्यांचे ९ तळ उद्ध्वस्त केले होते

ऑपरेशन सिंदूरबद्दल त्यांचे आणि पंतप्रधानांचे अभिनंदन केले. उत्तराखंडमधील मदरशांना मुख्य प्रवाहात आणण्याच्या आमच्या मोहिमेचा एक भाग म्हणून, आम्ही अभ्यासक्रमात ऑपरेशन सिंदूरचा समावेश करणार आहोत," असे कासमी यांनी सामगितले.

# तमन्ना भाटियाचा जबरदस्त डान्स

बॉलीवूड कलाविश्वात महत्त्वाचा समजला जाणारा 'झी सिने अवॉर्ड्स' सोहळा १७ मे रोजी मुंबईत पार पडला. या कार्यक्रमाला यंदा कार्तिक आर्यन, अनन्या पांडे, रश्मिका मंदाना, शर्वरी वाघ, क्रिती सेनॉन, तमन्ना भाटिया, राशा थडानी अशा अनेक कलाकारांनी उपस्थिती लावली होती. याशिवाय यंदा या सोहळ्यात काही सेलिब्रिटींनी सुपरहिट बॉलीवूड गाण्यांवर परफॉर्मन्स देखील सादर केले. याचे व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहेत. लोकप्रिय अभिनेत्री तमन्ना भाटिया तिच्या हटके नृत्यशैलीमुळे कायमच चर्चेत असते. तिचं 'स्त्री २' सिनेमातील 'आज की रात' हे गाणं सर्वत्र तुफान व्हायरल झालं होतं. 'झी सिने अवॉर्ड्स'मध्ये देखील तमन्नाने सुपरहिट बॉलीवूड गाण्यांवर जबरदस्त परफॉर्मन्स सादर केला आहे. करिना कपूर, कतरिना कैफ, ऐश्वर्या राय बच्चन या सगळ्या अभिनेत्रींच्या गाजलेल्या गाण्यांवर तमन्नाने डान्स केला.सध्या तमन्ना भाटियाचा 'कजरा रे...' गाण्यावर डान्स करतानाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. 'विरल भय्यानी' या पापाराझी पेजवरून हा व्हिडीओ शेअर करण्यात आला आहे., तिचे कमाल एक्स्प्रेशन्स या सगळ्या गोष्टींनी नेटकऱ्यांचं लक्ष वेधून घेतलं. "कजरा रे" गाण्यावर ऐश्वर्यनिच बेस्ट डान्स केला आहे, तिला कोणाचीच तोड नाही पण, तमन्ना सुद्धा खरंच खूप सुंदर नाचलीये", "तमन्नाचे एक्स्प्रेशन्स कमाल आहेत" अशा प्रतिक्रिया या व्हिडीओवर आल्या आहेत. दरम्यान, 'कजरा रे' हे गाणं २००५ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'बंटी और बबली' या चित्रपटातील आहे. या गाण्यात ऐश्वर्यासह तिचे सासरे अमिताभ बच्चन व पती अभिषेक बच्चन हे दोघंही एकत्र थिरकले आहेत. हे गाणं अलिशा चिनाई, शंकर महादेवन, जावेद अली यांनी गायलं असून, शंकर-एहसान-लॉय यांनी या गाण्याला संगीत दिलं आहे. आज २० वर्षांनंतरही या गाण्याची लोकप्रियता घराघरांत कायम आहे.



# प्रीती झिंटाचा 'तो' फोटो होतोय व्हायरल

बॉलीवूड अभिनेत्री प्रीती झिंटा ही अनेकदा विविध कारणांमुळे चर्चेत असते. आता अभिनेत्रीने सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या एका फोटोवर केलेले वक्तव्य चर्चेत आहे. प्रीती झिंटा ही आयपीएलच्या पंजाब किंग्स या संघाची मालकीण आहे. आयपीएलमध्ये राजस्थान रॉयल्सकडून खेळणारा १४ वर्षीय वैभव सूर्यवंशी व प्रीती झिंटाचा एक फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. हा फोटो राजस्थानमधील जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडियममधील आहे. दोघे एकमेकांना मिठी मारत असल्याचा हा फोटो आहे. हा फोटो सध्या व्हायरल होत असल्याचे पाहायला मिळत आहे.सोमवारी राजस्थान रॉयल्सने पोस्ट केलेल्या व्हिडीओवरून हा वाद निर्माण झाला आहे. या व्हिडीओमध्ये प्रीती एका सामन्यानंतर वैभवला भेटताना दिसत आहे. एक्सवर शेअर केलेल्या या व्हिडीओमध्ये दोघे एकमेकांशी बोलताना दिसत आहेत. तसेच दोघांनी हस्तांदोलन केल्याचेही पाहायला मिळत आहे.मात्र, सोशल मीडियालर व्हायरल होत असलेल्या फोटोमध्ये प्रीती वैभवला मिठी मारत असल्याचे दिसत आहे. हे राजस्थान रॉयलने शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये पाहायला मिळत नाही. त्यामुळे व्हायरल होत असलेला हा फोटो एडिट केलेला आहे. महत्त्वाचे म्हणजे अनेक मीडिया चॅनेल्सकडूनही फोटो बातम्यांमध्ये दाखवला जात आहे.

हा

# नेहा पेंडसेच्या घरात ६ लाखांची चोरी

छोट्या पडद्यावरील 'भाबीजी घर पर हैं' ही मालिका चाहत्यांच्या घराघरात पोहोचली आहे. या मालिकेत 'अनीता भाभी'ची मुख्य भूमिका मराठी अभिनेत्री नेहा पेंडसेने साकारली आहे. दरम्यान अनिता भाभीची भूमिका साकारणाऱ्या नेहा पेंडसेच्या घरातून ६ लाखांचा रुपयांची चोरी झाली आहे. नेहाच्या घरातील एका नोकराने ६ लाखांचे दागिने चोरून पळ काढलाय. यानंतर नोकराच्या विरोधात नेहाच्या पतीने शार्दुल पोलिसांत गुन्हा दाखल केल्यानंतर त्याला अटक करण्यात आली आहे. या नोकराचे नाव सुमित कुमार सोलंकी असे आहे. एका रिपोर्टच्या माहितीनुसार, 'भाबीजी घर पर हैं' मालिकेतील 'अनीता भाभी' म्हणजे, नेहा पेंडसे तिच्या पती शार्दुलसोबत अरिटो बिल्डिंग, वांद्रे पश्चिम, मुंबईत राहते. दरम्यान शार्दुलला घरातील ६ लाखांचे दागिने लंपास झाल्याची माहिती पोलिसांना दिली आणि घरातील नोकराच्या विरोधात गुन्हा दाखल केला. या तक्रारीत शार्दुलने चोरीला गेलेल्या वस्तुत सोन्याचे ब्रेसलेट आणि हिऱ्याची अंगठी असल्याचे सांगितले आहे. दरम्यान पोलिसांनी घरातील सर्व नोकरांना बोलावून त्याची चौकशी केली. मात्र, या चौकशीदरम्यान नेहा पेंडसे घरात राहत असेलला नोकर सुमित कुमार सोलंकी बेपत्ता असून तो कुलाब्यात असल्याचे समजते. यानंतर पोलिसांनी त्याला फोनवरून या चोरीबद्दल विचारणा केली असताना त्यांने उत्तरे देण्यास टाळाटाळ केली. या प्रकारावरून पोलिसांनी त्याच्यावर संशय घेत सुमितला अटक केली. मात्र, चोरीचे दागिने अद्याप सापडलेले नाहीत. दरम्यान त्याच्यावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. ड्राइव्हरने दिलेल्या माहितीनुसार, नोकर सुमित सोलंकीची दागिन्यांवर नजर पडली आणि त्याने त्याच्यावर डल्ला मारला. नेहाच्या घरी सुमित इतर लोकांसोबत राहत होता. सोन्याचे ब्रेसलेट आणि हिऱ्याची अंगठी या दोन्ही गोष्टी नेहाने शार्दुलला गिफ्ट केल्या होत्या.



# सुरभी ज्योती लवकरच म्हणणार 'कुबूल है'?

सध्या मनोरंजन विश्वातही लगीन घाई सुरु आहे. नुकतीच आमिर खानची मुलगी आयरा खानने नुपूर शिखरेसोबत लग्न केलं तर अभिनेत्री रकुल प्रीतने देखील तिचा बॉयफ्रेंड जॅकी भगनानीसोबत लग्न करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर आता आणखी एका अभिनेत्री नववधू होण्यासाठी तयार असल्याच्या चर्चा आहेत. ती अभिनेत्री म्हणजे कबूल है फेम अभिनेत्री सुरभी ज्योती. सर्वांची लाडकी झोया म्हणजेच सुरभी ज्योती तिचा बॉयफ्रेंड सुमित सुरीसोबत लग्न करणार आहे. सुरभी नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. ती तिच्या कामाव्यतिरिक्त लव्ह लाईफमुळे देखील चर्चेत राहिली आहे. सुमित सुरीपुर्वी सुरभीचे नाव अभिनेता पर्ल व्ही पुरीशी जोडले गेले होते. आता सुरभीच्या लग्नाची सोशल मिडियावर चर्चा होत आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, सुरभी ज्योती सुमित सुरीसोबत लग्नबंधनात अडकणार आहे. सुमित हा बिझनेसमॅन असण्याबरोबरच अभिनेता आणि निर्माता आहे. सुरभी बऱ्याच वर्षांपासून सुमितला डेट करत आहे. सुरभी आणि सुमित हे 6 किंवा 7 मार्चला लग्न करणार असल्याचा दावा सुरभीच्या जवळच्या मैत्रिणीने केला आहे. तिच्या लग्नात फक्त कुटुंब आणि मित्र उपस्थित राहणार आहेत. सुमित सूरीने द टेस्ट केस आणि होम सारख्या ओटीटी शोमध्ये काम केले आहे. त्याने सुरभीसोबत एका म्युझिक व्हिडिओमध्ये काम केले आहे. 2018 मध्ये त्याच्या नात्याच्या चर्चा सुरु झाल्या होत्या.

# सूर्यवंशी धोनीच्या पाया पडला!

## माहीच्या प्रतिक्रियेनेही वेधलं सर्वांचं लक्ष; VIDEO व्हायरल

। नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राजस्थान रॉयल्सने आयपीएल २०२५ च्या अखेरच्या सामन्यात शानदार विजय मिळवत मोहिमेचा शेवट केला आहे. राजस्थान रॉयल्सने चेन्नई सुपर किंग्सचा ६ विकेट्स १७ चेंडू बाकी ठेवत शानदार विजय मिळवला. राजस्थानच्या या विजयात संपूर्ण संघाचं योगदान होतं. पण वैभव सूर्यवंशीच्या फलंदाजीने सर्वांचं पुन्हा एकदा लक्ष वेधून घेतलं. पण याशिवाय वैभवच्या कृतीमुळे सर्वच जण त्याचं कौतुक करत आहेत.**



राजस्थान रॉयल्सच्या गोलंदाजांनी पहिल्या डावात चेन्नईच्या फलंदाजांवर वचक बसवला आणि त्यांना २०० धावांपर्यंत पोहोचू दिले नाही. चेन्नईने प्रथम फलंदाजी करताना १८७ धावा केल्या. चेन्नईने दिलेल्या लक्ष्याचा पाठलाग करताना राजस्थानने संथ सूरूवात केली. यशस्वीने एकाबाजूने फटकेबाजी केली, पण षटकारांची आतिषबाजी करणारा वैभव सूर्यवंशी शांत होता आणि त्याने या सामन्यात संथ सुरूवात करत नंतर आपलं रौद्ररूप दाखवलं.यशस्वी जैस्वाल बाद झाल्यानंतर वैभव सूर्यवंशीने संजू सॅमसनच्या जोडीने संघाचा डाव सावरला. वैभव सूर्यवंशीने या सामन्यात ३३ चेंडूत ४ चौकार आणि ४ षटकारांसह ५७ धावा करत अर्धशतक झळकावलं. राजस्थानला विजयाच्या उंबरठ्यावर आणण्यात संजूबरोबर वैभवनेही मोठं योगदान दिलं. अखेरीस ध्रुव जुरेलने षटकारांची आतिषबाजी करत संघाला विजय मिळवून दिला आणि विजयासह मोहिमेची सांगता केली.सामना संपल्यानंतर, जेव्हा दोन्ही संघांचे खेळाडू हस्तांदोलन करत होते, तेव्हा धोनी आणि वैभवही समोरासमोर आले. धोनी जवळ येताच, वैभवने एका हातो हस्तांदोलन करत धोनीच्या पायांना खाली वाकून स्पर्श केला आणि त्याचे आशीर्वाद घेतले. यानंतर, धोनीने वैभवकडे प्रेमाने पाहत त्याचं कौतुक केलं आणि वैभवनेही निरागस स्मितहास्य दिलं, वैभवच्या या कृतीने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आणि या क्षणाचा व्हीडिओ व्हायरल होत आहे.समालोचन करत असलेले हरभजन सिंग, नवज्योत सिंग सिद्धूदेखील वैभवची ही कृती पाहून त्याचं मनापासून कौतुक करताना दिसले. वैभववर केलेले संस्कार आणि भारतीय संस्कार यांच्याबाबतही वक्तव्य करत त्यांनी वैभवचं कौतुक केलं.राजस्थान रॉयल्सच्या गोलंदाजांनी पहिल्या डावात चेन्नईच्या फलंदाजांवर वचक बसवला आणि त्यांना २०० धावांपर्यंत पोहोचू दिले नाही. चेन्नईने प्रथम फलंदाजी करताना १८७ धावा केल्या. चेन्नईने दिलेल्या लक्ष्याचा पाठलाग करताना राजस्थानने संथ सूरूवात केली. यशस्वीने एकाबाजूने फटकेबाजी केली, पण षटकारांची आतिषबाजी करणारा वैभव सूर्यवंशी शांत होता आणि त्याने या सामन्यात संथ सुरूवात करत नंतर आपलं रौद्ररूप दाखवलं.यशस्वी जैस्वाल बाद झाल्यानंतर वैभव सूर्यवंशीने संजू सॅमसनच्या जोडीने संघाचा डाव सावरला. वैभव सूर्यवंशीने या सामन्यात ३३ चेंडूत ४ चौकार आणि ४ षटकारांसह ५७ धावा करत अर्धशतक झळकावलं. राजस्थानला विजयाच्या उंबरठ्यावर आणण्यात संजूबरोबर वैभवनेही मोठं योगदान दिलं.

### पुन्हा एकदा लक्ष वेधून घेतलं

अखेरीस ध्रुव जुरेलने षटकारांची आतिषबाजी करत संघाला विजय मिळवून दिला आणि विजयासह मोहिमेची सांगता केली.सामना संपल्यानंतर, जेव्हा दोन्ही संघांचे खेळाडू हस्तांदोलन करत होते, तेव्हा धोनी आणि वैभवही समोरासमोर आले. धोनी जवळ येताच, वैभवने एका हातो हस्तांदोलन करत धोनीच्या पायांना खाली वाकून स्पर्श केला आणि त्याचे आशीर्वाद घेतले. यानंतर, धोनीने वैभवकडे प्रेमाने पाहत त्याचं कौतुक केलं आणि वैभवनेही निरागस स्मितहास्य दिलं, वैभवच्या या कृतीने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आणि या क्षणाचा व्हीडिओ व्हायरल होत आहे.समालोचन करत असलेले हरभजन सिंग, नवज्योत सिंग सिद्धूदेखील वैभवची ही कृती पाहून त्याचं मनापासून कौतुक करताना दिसले. वैभववर केलेले संस्कार आणि भारतीय संस्कार यांच्याबाबतही वक्तव्य करत त्यांनी वैभवचं कौतुक केलं.राजस्थान रॉयल्सने आयपीएल २०२५ च्या अखेरच्या सामन्यात शानदार विजय मिळवत मोहिमेचा शेवट केला आहे.

# राजस्थानने विजयासह केला मोहिमेचा शेवट!

## दोन षटकं बाकी ठेवून चेन्नईवर मिळवला थरारक विजय

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राजस्थान रॉयल्सने आयपीएल २०२५ मधील अखेरच्या सामन्यात विजय मिळवत आपल्या मोहिमेचा चांगला शेवट केला. राजस्थानने २ षटकं बाकी ठेवत ६ विकेट्सने चेन्नई सुपर किंग्स संघावर विजय मिळवला. यासह राजस्थान रॉयल्सने यशस्वीपणे विजयाचं लक्ष्य दुसऱ्यांदा पार केलं. ध्रुव जुरेलने आपल्या षटकारांच्या जोरावर संघाला अखेरीस विजय मिळवून दिला आणि आपली फिनिशरची भूमिका चोख बजावली.**



राजस्थान रॉयल्सने चेन्नई सुपर किंग्जचा ६ विकेट्सने पराभव करून शानदार विजय मिळवला. या हंगामात राजस्थानचा हा चौथा विजय आहे. हे दोन्ही संघ आधीच प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडले आहेत आणि गुणतालिकेत तळाशी आहेत. त्यामुळे या सामन्याचा निकाल प्लेऑफच्या शर्यतीवर परिणाम करणार नाही. पण गुणतालिकेत दोन्ही संघाच्या प्रतिष्ठेचा मात्र प्रश्न होता.चेन्नई सुपर किंग्सने दिलेल्या १८८ धावांचा पाठलाग करताना राजस्थानची सुरुवात चांगली झाली. यशस्वी जैस्वालने १९ चेंडूत १८९.४७ च्या स्ट्राईक रेटने ३६ धावा केल्या. ज्यामध्ये ५ चौकार आणि २ षटकारांचा समावेश होता. तर वैभव सूर्यवंशीने संथ सुरूवातीनंतर ३३ चेंडूत ४ चौकार आणि ४ षटकारांसह ५७ धावा करत सामना एकतर्फी केला. दुसरीकडे, कर्णधार संजू सॅमसनने ४१ धावांचे योगदान दिले. त्यानंतर ध्रुव जुरेलने १२ चेंडूत नाबाद ३१ धावा करत राजस्थानला विजय मिळवून दिला.राजस्थानने संपूर्ण सामन्यात उत्कृष्ट सांघिक कामगिरी करत चेन्नई संघावर दबाव कायम ठेवला. या सामन्यात राजस्थान रॉयल्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, हा निर्णय संघाच्या पथ्यावर पडला. चेन्नईने फक्त १२ धावांत २ विकेट गमावल्या. यानंतर, आयुष म्हात्रेने वादळी खेळी खेळली आणि पॉवरप्लेमध्ये वेगाने धावा केल्या. पण राजस्थानच्या गोलंदाजांनी सामन्यात पुनरागमन केलं.आयुष म्हात्रेने २० चेंडूत ८ चौकार आणि १ षटकारासह ४३ धावा केल्या. त्याने २१५ च्या स्ट्राईक रेटने धावा करत संघाचा चांगली सुरूवात करून दिली. यानंतर, डेवाल्ड ब्रेव्हिसने २५ चेंडूत ४२ धावा केल्या आणि संघाला मोठ्या धावसंख्येकडे नेले. शिवम दुबेनेही ३९ धावा केल्या.

### प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर

या हंगामात राजस्थानचा हा चौथा विजय आहे. हे दोन्ही संघ आधीच प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडले आहेत आणि गुणतालिकेत तळाशी आहेत. त्यामुळे या सामन्याचा निकाल प्लेऑफच्या शर्यतीवर परिणाम करणार नाही. पण गुणतालिकेत दोन्ही संघाच्या प्रतिष्ठेचा मात्र प्रश्न होता.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। बुधवार ।
। दि. 21 मे 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती









# पिंपरी चिंचवडमध्ये शिवसेनेतर्फे तिरंगा रॅली!

## भारतीय सेनादलाचा गौरव; शिवसैनिकांचा प्रतिसाद

**। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**पहलगाम हल्ल्याचे चोख प्रतिउत्तर भारतीय लष्कर, वायुदल, आणि नौदलाने "ऑपरेशन सिंदूर"च्या माध्यमातून दिले. दहशतवादी हल्ल्यात मृत झालेल्या पर्यटक व ऑपरेशन सिंदूरमध्ये शहीद झालेल्या सैनिकांना श्रद्धांजली वाहण्यासाठी तसेच भारतीय संरक्षण दलाच्या कामगिरीचा गौरव करण्यासाठी आज पिंपरी चिंचवडमध्ये शिवसेनेच्या वतीने तिरंगा रॅली काढण्यात आली.**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार तसेच शिवसेना उपनेते इरफान सय्यद, जिल्हाप्रमुख भगवान पोखरकर व भोसरी विधानसभा शहर प्रमुख संभाजीराव शिरसाट यांच्या मार्गदर्शनाखाली ही रॅली काढण्यात आली.

पिंपरी चिंचवड शहरातील भोसरी विधानसभा मध्ये ही तिरंगा यात्रा काढण्यात आली. तिरंगा यात्रेमध्ये सहभाग घेत मोठ्या उत्साहामध्ये शिवसैनिकांनी, युवकांनी ऑपरेशन सिंदूरच्या ऐतिहासिक विजयाबद्दल भारतीय सैन्याचा जय-जयकार केला.

यावेळी तिरंगा रॅलीमध्ये शिवसेना महिला उपनेत्या सुलभा उबाळे, शिवसेना नेते निलेश मुटके,शिवसेना खेड तालुकाप्रमुख निलेश पवार , दादासाहेब उर्फ संतोष उकिर्डे युवा सेना जिल्हा उपप्रमुख अरुण जोगदंड उपस्थित होते.

> पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूर यशस्वी करत पाकिस्तानातील अतिरेक्यांचे आठ तळ उद्ध्वस्त केल्याबद्दल भारतीय सेनादलाचे अभिनंदन करण्यासाठी ही तिरंगा रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला.
>
> **-इरफान सय्यद,** शिवसेना, उपनेते


ADMISSION OPEN
Moraya Shikshan Sanstha
"यत् भावो – तत् भवति"
Computer 15 days Crash Course
Our Courses
> PowerPoint with animation
> Basic Excel
> Corel Draw
> Adobe Photoshop
> Scratch Animation
> 'C' Language
> Basic Java
> Basic Tally
From
26th May 2025
1 Hour /day
Monday to Saturday
Contact
8087706100
Registration started
Venue: Computer Lab,
V. K. Mate Highschool


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Swami Vivekanand Shikshan Prasarak Mandal's
GAYATRI GROUP OF SCHOOLS,
PUNE
ADMISSIONS OPEN
2025-26
PRE-PRIMARY
TO
HIGHER-SECONDARY
For more info
95277 64646 / 77967 67292


Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42 Years of Excellence in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic
Empowering
Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org